# व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तान्तर': एक पुनरावलोकन

**प्रा. शैलेश औटी**

*साहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,*

*अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसईरोड, जि. पालघर*

सत्तान्तर ही व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांपैकी सर्वात शेवटी (जुलै १९८२) प्रसिद्ध झालेली कादंबरी. १९८३ या वर्षासाठी साहित्य अकादेमीचा पुरस्कारही या कादंबरीला प्राप्त झाला आहे. अवघ्या सत्याहत्तर पृष्ठांचा भाषिक अवकाश व्यापणारी, आठ प्रकरणांची, केवळ वानरपात्रांच्या माध्यमातून आकाराला आलेली ही एक लघुकादंबरिका आहे. माडगूळकरांच्या अन्य कथनात्म साहित्यकृतींप्रमाणेच या कादंबरीतही त्यांची सुप्रसिद्ध चित्रदर्शी शैली जाणवते. या कादंबरीचे कथानक जंगलातील वानरांच्या टोळ्या आणि त्यांच्यातील सत्तासंघर्षाशी संबंधित घटनाक्रमाने आकाराला आले आहे. कादंबरीतून सांगितली जाणारी गोष्ट ही सर्वसाधारणपणे मानवी वर्तनाभोवती रचलेली असते. एखाद्या कथनात्म साहित्यकृतीमध्ये मनुष्यपात्रे नसली तरी मानवेतर जीवसृष्टीतील पात्रांच्या माध्यमातून कादंबरीदेखिल निश्चितपणे मानवी वृत्तिप्रवृत्तींबद्दलच बोलत असते. दैनंदिन मानवी भाषेत म्हणी वाक्प्रचारादि वाक्संप्रदायांच्या माध्यमातून एखाद्या मनुष्याचा प्राणीरूपाने उल्लेख करत मानवी कृतीउक्तींना, त्याच्या स्वभाववैशिष्ट्यांना प्राणीजगताशी जोडत रूपकात्मकता साधली जात असतेच. साहित्यव्यवहार हा एकूणच रूपकात्मकतेकडे रोखलेला असल्याने विविध साहित्यकृतींमध्येही पशूपक्ष्यांचे असे प्रत्यक्षाप्रत्यक्ष अस्तित्व विपुल प्रमाणात आढळून येते. मानवेतर जीवांचे साहित्यकृतीमध्ये नुसते अस्तित्व अथवा वावर असणे, काल्पनिक प्राण्यांना आवाहन करून त्यांच्याशी संवाद साधणे, पशूपक्ष्यांनी मानवी वाणीने बोलणे, माणसांच्या कृतींना समांतर असे पशूपक्ष्यांच्या कृतींचे चित्रण करणे अथवा केवळ प्राणीसृष्टीतील परस्परव्यवहारांचे दर्शन साहित्यकृतीमधून घडवणे अशी नानाविध परींनी आणि विविध पातळ्यांवर प्राणीसृष्टी साहित्यात अवतरते. बहुधा मानवी कृतींवर वेगळ्या कोनातून प्रकाश टाकण्यासाठी, त्यामधील हास्यास्पदता, विसंगती, विरोधाभास उघड करत त्यावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष भाष्य करण्याच्या दृष्टीने उपयुक्त सामग्रीच्या स्वरुपात प्राणीपात्रांचे क्रियाकलाप कथानकात प्रविष्ट होताना दिसतात. विविध संस्कृतींमधील पारंपरिक लोकगीते, लोककथा, नीतिकथा, तात्पर्यकथा (उदा. इसापनीति, हितोपदेश, पंचतंत्र यांमधील कथा, पारंपरिक व्रतकथा तसेच कहाण्या) काही बालगीते त्याचप्रमाणे आधुनिक काळातील काही कथा, कविता तसेच कादंबऱ्या यामध्ये अशा प्रकारची विपुल उदाहरणे आढळतात. जॉर्ज ऑरवेल यांची संपूर्णपणे प्राणीपात्रांनी आकाराला ॲनिमल फार्म ही कादंबरी, प्रवीण दशरथ बांदेकर यांची इंडियन ॲनिमल फार्म ही कादंबरी. अरुण कोलटकर यांचे प्रामुख्याने वानरपात्रांभोवती गुंफलेले द्रोण हे आधुनिक आख्यानकाव्य, जी.ए. कुलकर्णी यांच्या कथा किंवा भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांमधील विविध प्राण्यांचे सूचक उल्लेख इ. उपरोल्लेखित साहित्यकृतींची यासंदर्भात आठवण होण्याचे कारण म्हणजे वर उल्लेख केलेल्या साहित्यकृतींप्रमाणेच सत्तान्तर ही कादंबरीही प्राणीपात्रांनी आकाराला आलेली आहे. या कादंबरीत एकही मनुष्यपात्र नाही. तरीही ती मानवी जगाकडे निर्देश करत राहाते.

येथे सत्तान्तर या कादंबरीचे पुनरावलोकन करताना काही प्रश्नांना समोर ठेवले आहे. प्राणीसृष्टीतील पात्रांच्या सहाय्याने उलगडणारे कादंबरीतील विश्व काहीएक सशक्त रूपक उभे करू शकते का? जर वानरांच्या टोळ्यांच्या निमित्ताने ही कादंबरी मानवी जगाकडे निर्देश करत असेल तर मानवी जगाचे कोणते मूर्त संदर्भ या कादंबरीशी संलग्न होऊ शकतात? जीवनविषयक कोणत्या मूल्यांकडे या कादंबरीचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे रोख आहे? वानरांच्या जगातील सत्तान्तराच्या मिषाने ही कादंबरी मानवी जगातल्या सत्तेच्या कोणत्या संरचनांकडे निर्देश करू पाहाते आहे? कादंबरीचे पुनरावलोकन करताना या कादंबरीच्या कथानकाचा थोडक्यात आढावा घेऊन निवेदनाची आणि पात्रचित्रणाची तसेच आनुषंगिक स्वरुपात काही भाषिक वैशिष्टयांचीही चर्चा केली आहे. कादंबरीच्या विश्लेषणामधून लेखकीय दृष्टीसंबंधी काही निरीक्षणे मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे. याशिवाय उपरोक्त प्रश्नांच्या प्रकाशात या कादंबरीच्या काही संरचनावैशिष्ट्यांची चर्चा करत काही दडलेले अन्वयार्थ पृष्ठभागावर आणण्याचा प्रयत्नही प्रस्तुत लेखात केला आहे.

**आशयसूत्रे :**

या कादंबरीतून थेट प्रकट होणारी काही आशयसूत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. जीवनाचे म्हणजे जननमरणाचे चक्र अव्याहत सुरू असते या चक्रात सहजप्रेरणांनुसार संघर्ष करून समूहातील कोणीतरी सत्ताधीश होतो.
२. या संघर्षात बळी तो कानपिळी याच गोष्टीचा प्रत्यय
३. बीजक्षेत्रन्याय – ज्याचे बीज त्याचेच क्षेत्रातील उत्पादनावर स्वामीत्त्व

४. एक सत्ताधारी गेला की दुसरा येणार यातील अपरिहार्यता याखेरीज ही कादंबरी दूरान्वयाने ज्या मानवी जगाकडे निर्देश करते त्या मानवाची कुंटुबव्यवस्था, मानवी समाजसंघटन यामधे असणारी स्वार्थमूलकता या सूत्राकडेदेखिल या कादंबरीतून निर्देश होतो.

**कथानक :**

या कादंबरीचे कथानक प्रामुख्याने वानरांच्या दोन टोळ्यांभोवती गुंफलेले आहे. जंगलातील दोन ठराविक क्षेत्रांत वावरणाऱ्या वानरांच्या दोन टोळ्या आणि कोणत्याही टोळीचा सदस्य नसलेल्या, किंबहुना टोळीच्या संरक्षित जगामधून बाहेर हाकलल्या गेलेल्या भटक्या नरवानरांची झुंड यांच्यातील परस्परसंबंधांचे चित्रण आले आहे. वानरांच्या टोळ्यांमध्ये एका विशिष्ट कालावधीनंतर नेमाने होणाऱ्या सत्तापालटाच्या चक्रामधील एका सत्तापालटाची घटना या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. जंगलांमध्ये असणाऱ्या वानरटोळीच्या प्रमुख नराला बाजूला सारून दुसरा एखादा नरवानर टोळीचा प्रमुख बनतो. मात्र जोवर त्याच्या अंगी ताकद आहे तोवरच त्याला टोळीचे नायकत्व राखता येते. दुसरा कोणीतरी तरुण नर येऊन त्याला स्थानभ्रष्ट करतो... आणि हे चक्र असेच चालू राहते. जंगलातील एका टोळीचा प्रमुख असलेला मुडा नावाचा वानर, त्याच्या शेजारच्या हद्दीत असलेल्या दुसऱ्या टोळीचा प्रमुख असलेला लालबुड्या हा वानर, वयात येत असलेल्या सहा तरुण नरवानरांची झुंड आणि तिच्यात सर्वात थोरला असलेला मोगा आणि त्याच्या खालोखाल शक्तिमान असलेला दाढीवाला या नरांमधील सत्तासंघर्ष त्याचबरोबर आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक टोळीतील माद्या आणि लहान पिल्ले यांच्या जीवनसंघर्षाची कहाणी वाचकांसमोर उलगडत जाते. सुरुवातीला टोळीप्रमुखाचे बळ आजमावण्यासाठी त्याला भटक्या वानरांच्या झुंडीने दिलेली आव्हाने त्यानंतरच्या टप्प्यावर केलेले काही अयशस्वी तसेच काही यशस्वी हल्ले आणि या सर्वांची परिणती होऊन घडून येणारे सत्तान्तर येथे चित्रित केले आहे.

या कादंबरीतील स्थळकाळ, घटनाप्रसंग आणि पात्रे यांच्याकडे पाहिल्यास प्रथमदर्शनी वन्य प्राण्यांच्या नाविन्यपूर्ण जगाचे एक मनोवेधक चित्र वाचकांसमोर ठेवणारी एक मानवनिरपेक्ष निरुपद्रवी जंगलकथा दिसते. प्राणीजगताचे, त्यांच्या जीवनव्यवहाराचे दर्शन घडवणाऱ्या विविध दूरचित्रवाणी वाहिन्या प्रचलित होण्यापूर्वीच्या काळात सर्वसामान्य शहरी मध्यमवर्गीय वाचकाला अपरिचित असलेल्या जगाची सफर घडवून आणणारी अशी ही कथा आहे. मात्र संहितेच्या असंज्ञ पातळीवर धांडोळा घेत, या कादंबरीतून सूचित होणारी बाहेरच्या राजकीय तसेच सामाजिक संदर्भांशी जोडणारी सूत्रे स्पष्ट करत गेल्यास मानवी जगाशी या जगाचे अनुबंध उलगडत जातात. जीवनाकडे पाहाण्याचे विविध दृष्टिकोण, मानवी जीवनमूल्ये, सत्तासंबंध, राजकारण, यांच्यासंदर्भात काही नव्या अपरिचित अर्थांचा शोध घेणे शक्य होते. या कादंबरीच्या सुरुवातीलाच (किंबहुना पहिल्या प्रकरणाची सुरुवात होण्यापूर्वीच) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे अवतरण वाचकासमोर येते.

*'मनुष्य हा पशुकोटीतील प्राणी आहे व त्याचे जवळचे सगेसोयरे पशु म्हटले, म्हणजे वानर होत.'*

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ('भारतीय विवाह-संस्थेचा इतिहास')

म्हणजेच या कादंबरीत वानर या पशुकोटीतील जीवांच्या बाबतीत जे काही घडते आहे ते तपशिलाचे फरक वगळल्यास मनुष्यप्राण्याच्या बाबतीतही तितकेच खरे आहे. याठिकाणी मानवी जगाचे वानरांच्या जगाशी असणारे अनुबंध सूचित करण्याचा उघड प्रयत्न अगदी सुरुवातीपासूनच दिसतो आहे.

सत्तान्तर या कादंबरीत एकही मनुष्यपात्र नाही तसेच मनुष्यवाणीने बोलण्याचे सामर्थ्यही या कादंबरीतील कथानकरचनेत वानरपात्रांना दिलेले नाही. साहजिकच या कादंबरीच्या भाषिक अवकाशात पात्रांच्या भाषिक संवादांना मुळीच वाव नाही. त्यामुळे लेखकाने योजलेल्या कथाबाह्य (तृतीयपुरुषी) निवेदकाने केलेल्या निवेदनाच्या माध्यमातूनच कथानक उलगडत जाते. अर्थातच निवेदकाने केलेले निवेदन हा घटक संख्यात्मकदृष्ट्या तिच्या संहितेचा सर्वाधिक भाषिक अवकाश व्यापताना दिसतो. याशिवाय अधुनमधुन वन्य प्राण्यांची, विशेषतः वानरांची रेखाचित्रे हे या लघुकादंबरिकेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

**निवेदनाचे स्वरूप : (निवेदनाचे चित्रदर्शित्व)**

कादंबरीचे विश्लेषण करताना तिचा सर्वाधिक भाषिक अवकाश व्यापणारा निवेदन (कथन) हा घटक सर्वप्रथम विचारात घेता येईल. स्थळ-काळ, घटना-प्रसंगांची बारीकसारीक तपशीलांसह चित्रदर्शी वर्णने, विविध वानरपात्रांची ओळख करून देताना त्यांची दृश्य शारीरिक वैशिष्ट्ये आणि त्यांच्या कृती यांचे रोखलेल्या कॅमेऱ्यामधून चलच्चित्रण करावे तसे निवेदकाने शब्दांच्या माध्यमातून केलेले तपशीलवार चित्रण, पात्रांना आलेल्या अनुभवांचे निवेदकाने केलेले स्वतःच्या शब्दांतील कथन, वानरांच्या कृतींचे चित्रण करताना मानवी कृतींकडे टाकलेला तिरकस दृष्टिक्षेप, क्वचितप्रसंगी काही निवडक वानरपात्रांचे आतून चित्रण करताना निवेदकाच्या शब्दांत मांडलेले त्यांचे मनोगत आणि अधूनमधून येणारी तात्पर्यात्मक भाष्ये असे या निवेदनाचे स्वरूप आहे. उपमारुपकांचे प्राचुर्य हेही या निवेदनाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणता येईल. कादंबरीचा निवेदक दिलेल्या तपशिलांचा

नेमकेपणा या वैशिष्ट्यांची चर्चा करताना प्रथम त्याची काही उदाहरणे पाहता येतील (ठळक छाप मुळात नाहीत)

१. ... वरच्या डहाळ्यांतून आठ फूट खालच्या डहाळ्यांवर दाणकन् उडी ठोकली. (पृष्ठ १)
२. ह्या हुप्प्याच्या डाव्या कानाचा, वरच्या बाजूचा मोठा तुकडा हाणामारीत गमावला होता...शेपटावर सुद्धा चांगला दीडफूट लांब असा उभा वण होता. (पृष्ठ ४)
३. हा विधी आता आठ-दहा मिनिटं चालायला काहीच हरकत नव्हती. (पृष्ठ ४)
४. सकाळी साडेपाच वाजता आभाळ तांब्याचं होई... नऊ वाजले नाहीत, तोवर पांढरेधोट ऊन्ह आभाळातून खाली ओतू लागे. (पृष्ठ ५)
५. बारा दशलक्ष वर्षांमागे अफ्रिकेत जन्माला आलेला हा वानरांचा वंश. (पृष्ठ ७)
६. चाळीस चाळीस, साठ साठ फूट उंचीचे भव्य वृक्ष (पृष्ठ५)
७. लहान-मोठ्या अश्या आणखी सात टोळ्या
८. गेले चार पावसाळे तो टिकून राहिला होता.
९. आज त्याची टोळी सोळा जणांची होती. सात वानरी होत्या, चार लहान पोरं होती. तीन दीड वर्षा सवा वर्षाची नरपोरं होती आणि दोन, वयात येऊ घातलेल्या पोरी होत्या (पृष्ठ ७)

वरील उदाहरणांमधील ठळक केलेली विशेषणे खासकरून संख्याविशेषणे, कालिक विशेषणे, संवेदनात्मक तपशील तसेच शास्त्रीय माहितीवजा सूक्ष्म तपशील पुरवणे हे या निवेदनाचे एक वैशिष्ट्य जाणवण्याइतपत ठळक आहे. परंतु हे माहितीपर पुस्तक नसून ललित साहित्यकृती आहे ही गोष्ट येथे लक्षात घ्यायला हवी. मग अशी शास्त्रीय, नेमकी माहिती पुरवण्याचा उद्देश काय ते आपण निवेदनप्रक्रियेची वैशिष्ट्ये नोदविताना पाहाणार आहोत. येथे उल्लेख केलेले किंवा याहूनही अधिक बारीकसारीक तपशील अथवा कालावकाश कादंबरीत येऊ नयेत का? कादंबरी या साहित्यप्रकाराची समावेशकता आणि खुलेपणा पाहाता आपल्याला तसे निश्चितपणे म्हणता येणार नाही. मात्र या सर्व तपशीलामधून निर्माण होणाऱ्या सामग्रीला लेखक कोठे नेऊ पाहातो आहे हे पाहिल्यास शेवटच्या टप्प्यावर लेखकीय मूल्यदृष्टीसंबंधी काही निरिक्षणे नोंदवणे शक्य होऊ शकेल.

अशाच प्रकारे उपमांच्या प्राचुर्याचीदेखील काही उदाहरणे पाहता येतील.

१. भला मोठा विस्तार असलेलं हे जांभळीचे झाड, फळांनी फणसाचं झाड लहडावं, तसं आता वानरांनी लहडलं होतं (पृष्ठ१)
२. एकूणच हा खैराच्या गाठीसारखा टणक होता. (पृष्ठ४)
३. बाया बाया एकत्र बसून उखाळ्या-पाखाळ्या करण्यात रमतात, तेव्हा दिसतो, तसा खेळीमेळीचा, निवांत असा देखावा दिसू लागला. (पृष्ठ ५)
४. चोरामागोमाग फौजदार दौडत जावा, तसा मुडा त्याच्यामागोमाग गेला (पृष्ठ ३१)

वर उल्लेखित उदाहरणांप्रमाणे आणखीही अनेक उदाहरणे या कादंबरीत ठिकठिकाणी पाहावयास मिळतात. जसे-तसे, ...सारखा, प्रमाणे, तसं, तसा, तशी, तसे अशा शब्दप्रयोगांची या कादंबरीतील संख्याही लक्षणीय आहे.

**निवेदनप्रक्रियेची वैशिष्ट्ये :** (निवेदनप्रक्रियेवरील निवेदकाचे विविधस्वरुपी नियंत्रण आणि निवेदकाने धारण केलेली सत्ता) हे सर्व कथानक ज्या अवकाशात घडते त्या जंगलातील विविध ठिकाणांचे भौगोलिक तपशील, प्राणी-पक्षी तसेच वृक्षांची नावे, त्यांची रंगरूपादि वैशिष्ट्ये निवेदकाच्या निवेदनात नेमकेपणाने येतात. विविध घटना घडण्याची नेमकी वेळ निवेदक सांगतो (उदाहरणार्थ पहाटे साडेपाच, सकाळी नऊ). एखाद्या घटनेची परिणती कशात होणार हेही तो अधिकारवाणीने सांगतो. तीच गोष्ट भूतकालीन घटनांविषयीच्या निवेदनासंबधीही घडते (उदा. लालबुड्या वानराचा जन्म बालपण त्याच्या मनातील भीतीला कारणीभूत प्रसंग हे सर्व हा निवेदक अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म तपशीलांसह सांगतो) एखाद्या घटनेची पूर्वपीठिका त्यातील कालिक, अवकाशात्म, भावनात्मक तसेच आणि संवेदनात्मक तपशीलांसह या निवेदकाला ज्ञात असते. अशा प्रकारे निवेदकाला पात्रांपेक्षा, वाचकांपेक्षा अधिक माहिती असणे,ती त्याने विशिष्ट पद्धतीने (शास्त्रीय,संख्यात्मक, संवेदनात्मक तपशिल पुरवत, उपमा-रुपकादिंच्या सहाय्याने) चित्रदर्शी शैलीमधून तसेच भविष्यदर्शित्वाच्या भूमिकेमधून सादर करण्यामधून आपण दाखवू त्याच दृष्टिकोनातून वाचकाला पाहायला लावतो. चित्रपटात जशी चित्रचौकट (Frame) ही विशिष्ट दृश्य, त्या दृष्यापासूनचे अंतर, विशिष्ट कोन या गोष्टी नियंत्रित करते त्याचप्रमाणे कथेत येणाऱ्या घटना, कालावकाश, पात्रे यांसबंधीच्षा माहितीवर निवेदकाचे नियंत्रण कधीही सैल होत नाही. याचसंदर्भात कादंबरीतील निवेदकाच्या निष्कर्षात्मक भाष्यांचे अथवा सुभाषितवजा उक्तींचे स्वरूप कसे आहे ते थोडक्यात पाहाता येईल.

आजूबाजूला विविध प्रकारचे धोके असताना वानरांचा पाणी पिण्याचा प्रसंग चित्रीत करताना निवेदकाची सुभाषितवजा उक्ती येते.

१. 'कोणतीही धारिष्टाची गोष्ट करताना आणीबाणीचे क्षण अगदी थोडे असतात आणि त्यांना सामोरं जाणं हीच खरी परीक्षा असते.' (पृष्ठ १२) किंवा वानरांच्या दोन

टोळ्यांमधल्या लुटुपुटीच्या लढाईबद्दल निवेदकाचे निष्कर्षात्मक भाष्य येते.

२. 'निकराच्या चकमकीत विनाश होता, तो टाळून आपल्या ताकदीचं प्रदर्शन प्रतिस्पर्ध्याला व्हावं असाच सगळा रोख होता' (पृष्ठ २२)

या संदर्भात माद्यांच्या लैंगिक वर्तनाविषयी बोलताना हा निवेदकीय पक्षपात उघड होतो.

काही मिळवण्यासाठी, त्या बदल्यात आपलं शरीर नराच्या हवाली करण्याची ही पद्धत काही मनुष्य-प्राण्यानंच स्वीकारलेली नाही! (पृष्ठ ३१) कोणा नराशी जवळीक करण्याच्या माद्यांच्या कृतीचे अवमूल्यन करत मानवप्राण्यांमधील वेश्यावृत्तीशी त्याचा संबंध जोडून हा निवेदक मोकळा होतो. अर्थातच येथे तो वानरींबद्दल कमी आणि मानवी स्त्रियांबद्दल अधीक बोलतो आहे हे स्पष्ट आहे. किंवा आणखी एक उदाहरण घेतल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल. उदा. वानरांच्या वंशविस्तारासंबंधी निवेदक काय बोलतो ते याच संदर्भात पाहाता येईल

वंशवेल फुलत राहत होता. तो अरिष्टात सापडून नष्ट होऊ नये, म्हणून एकाच टोळीत, आपापसात प्रजा निर्माण होत नव्हती. काही उनाड्या वानरी इतरांचा डोळा चुकवुन बाहेर जात होत्या परद्वार करत होत्या त्या टोळीतील पुरुषबीज ह्या टोळीत आणत होत्या. (पृष्ठ ३६) येथे वानरींसाठी योजलेले उनाड्या हे विशेषण असो, की त्यांच्या कृतीचे बाहेर जाणे, परद्वार करणे असे वर्णन असो, येथेच अनुषंगिकरित्या आलेला बीजक्षेत्रन्यायाचा आणि वंशशुद्धीचा मुद्दाही निवेदकाच्या मूल्यदृष्टीकडे निर्देश करतो. थोडक्यात येथे मानवी समाजाच्या पुरुषप्रधान दृष्टिकोनातून प्राणीसृष्टीकडे पाहिले जात आहे.

मात्र नराच्या लैंगिक वर्तनाविषयीचा निवेदकाचा दृष्टीकोन वेगळा असल्याचे दिसते. दोन्ही टोळ्यांमधील माद्यांवर हक्क प्रस्थापित करू पाहाणाऱ्या मुडाच्या वर्तनाचा अर्थ लावताना हा निवेदक खास पुरुषी दृष्टीकोनातून कथावस्तूकडे पाहातो. नराच्या वर्तनाचे समर्थन करणाऱ्या निवेदकाचा कादंबरीतील घटना-पात्रे याच्याविषयीचा सूक्ष्म पक्षपात अनेक ठिकाणी जाणवतो.

उदा. पुढील अवतरण पाहा

दिवसातला बराच वेळ तो हा टोळीतल्या त्या दोघी वानरींसोबत काढायचा. त्या आळीपाळीने त्याचं अंग विंचरायच्या. संध्याकाळी मात्र मुडा आपल्या कळपात हजर व्हायचा. दिवसा तिकडे थोडावेळ गस्त घातली, की रात्री आपल्या कायमच्या टोळीत झोपायला यायचा. एक ना एक दिवस ह्या दोन्ही टोळ्यांतील माद्या एकत्र येतील आणि आपल्या अधिकाराखाली गुण्यागोविंदानं नांदतील, असा त्याला भरवसा होता. (पृष्ठ २९)

मुडा ह्या नरवानराच्या उपरोक्त वर्तनाचे दर्शन घडवताना त्याकडे बाहेरख्यालीपणाच्या अंगाने पाहीले जाऊ नये याची दक्षता घेत निवेदक त्याच्या मनात शिरून त्याचं मनोगत व्यक्त करतो. एखाद्या सम्राटाचे साम्राज्यविस्ताराची मनसुबे आणि व्यूहरचना जाहीर करावी अशा थाटात हे निवेदन येते. मुडाचा डाव असा होता, की दोन्ही डगरींवर पाय ठेवावेत, एक आपल्या टोळीत रोवलेला तर असावाच; पण ह्या टोळीतही एक पाय असू द्यावा. त्यामुळे त्याची प्रजा वाढणार होती. राज्याच्या सीमा वाढणार होत्या. अन्न वाढणार होतं. मुडा अधिक सामर्थ्यवान होणार होता.

वरील निवडक उदाहरणांमधून नर आणि मादी या दोहोंच्या वर्तनाला वेगवेगळा न्याय लावण्याची निवेदकाची पक्षपाती दृष्टी स्पष्ट जाणवू शकते.

...पण मुडाला शह द्यायचा, तर त्या पाची जणांची मदत त्याला हवी होतीच. सत्ता काबीज करणं ही एकट्या-दुकट्याची कामगिरीच नसते. दोन हात झोपडी उभारू शकतात; प्रासाद उभा करायचा, तर हजारो हात लागतात.(पृष्ठ ३७) आपल्या सहजप्रेरणांनुसार वागणाऱ्या पशुपात्रांचे (त्यांपैकी निवडक पात्रांचेच) मनोगत प्रकट करताना निवेदक काय करतो हे पाहाणे सर्वसाक्षी आणि येथील संदर्भापुरता सर्वज्ञ असलेल्या निवेदकाने मोगा या वानराच्या मनात शिरून प्रकट केलेले हे मनोगत आणि त्यापुढे आलेले भाष्य कोणाकडे रोखलेले आहे? अर्थातच सत्तास्थापनेसाठी झुंडशाहीच्या मार्गाने संघटना उभारणे, तिच्या सदस्यांचा वापर करून स्वतः सत्तासंपादन करणे हा मानवी जगातला राजमार्ग जणू वानर जाणीवपूर्वक अवलंबतो आहे असे या मनोगतामधून दर्शविण्याचा प्रयत्न आहे. अर्थातच निवदकाला याची चिकित्सा अथवा अवमूल्यन करावेसे वाटत नाही येवढे येथे लक्षात घेतले तरी पुरेसे आहे.

...पळून गेलं. की सगळ्या धोक्यांतून सुटका होते, असं थोडंच आहे? धोक्यामुळं तर दहाजण एकत्र येतात आणि राहू लागतात. एकत्र राहण्यासाठी धाक लागतोच. बाहेरचा नसला, तरी घरातला. घरातला नसला, तर मनातला. (पृष्ठ ६२) संघटनेच्या अथवा कुटुंबव्यवस्थेच्या एकीकरणासाठीचे संघटनातत्त्व काय आहे? तर धाक अथवा भीती. दहा जणांनी एकत्र यावे यासाठी ते जणू आवश्यकच! हे भय मनोनिर्मित अथवा काल्पनिक असले तरी समर्थनीय आहे असे दिसते आहे. कोणत्यातरी काल्पनिक शत्रूपासून संरक्षण व्हावे यासाठी धाकाच्या स्वरूपात राजकीय प्रणालीने पेरलेल्या व्यूहरचनेचे सूचन आणि समर्थन येथे होते आहे.

जीवनसंघर्षाच्या सातत्याविषयी आणि या संघर्षाच्या स्वरूपाविषयीचा निवेदकाच्या भाष्याच्या स्वरूपात येणारा पुढील उतारा निवेदकाच्या माध्यमातून येणाऱ्या लेखकीय दृष्टीकोनाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे.

काळाप्रमाणंच संघर्षही सतत वाहतच असतो. त्याला खंड असा नसतोच असलीच तर भरती असते, पूर असतो. जेव्हा जेव्हा खाणारी तोंड भरमसाठ वाढतात, गर्दी होते, तेव्हा तेव्हा संघर्ष बळावून उठतो. जेव्हा उपलब्ध अन्नात, भूमीत वाटेकरी निर्माण होतात, तेव्हा संघर्ष उचल खातो. जेव्हा अस्थिरता निर्माण होते, एखादी जात धोक्यात येते, बाहेरून परकं कोणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो. ज्यांना बोलता येतं ते हा राग, उद्दामपणा, संघर्ष शब्दांतून दाखवतात. ज्यांना बोलता येत नाही, त्यांचे रागलोभ, प्रेम हावभावांतून, स्पर्शातूनच सांगितलं जातं. संघर्ष पेटला की शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात, ते सुळे नखं वापरतात.संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो.(पृष्ठ ७०)

वरील भाष्याच्या माध्यमातून कोणते राजकीय-सामाजिक प्रतिमान समोर येते? निवेदकीय दृष्टिकोनातून वंशशुद्धी महत्त्वाची आहे. आणि एका बंदिस्त समाजरचनेत बाहेरून शिरकाव करू पाहाणाऱ्यांना अटकाव करणं निवेदकाला महत्त्वाचे वाटते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात विशिष्ट समुदायांना परके, घुसखोर आणि धोकादायक ठरवून छळछावण्यांमध्ये रवानगी करणाऱ्या किंवा सांप्रतकाळात जगभरातच परके घुसखोर ठरवून कोणाला तरी हद्दपार करू पाहाणाऱ्या किंवा त्यानिमित्ताने संघर्षाला ऊत आणणाऱ्या फॅसिस्ट राजकीय विचारसरणीला जवळचा वाटावा असा हा दृष्टिकोण छुपेपणाने वरील भाष्यांमधून गर्भित लेखकाच्या मूल्यदृष्टीकडेही निर्देश करतो

अशा प्रकारची विविध भविष्यवेधी, तत्त्वदर्शी, सुभाषितवजा, निष्कर्षात्मक भाष्ये अनेक ठिकाणी निवदकाच्या निवेदनात येतात. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे या कादंबरीत पात्रांना संवाद नाहीत.

पात्रांच्या विविध कृतींचे हव्या त्या ठिकाणी जाऊन हा निवेदक दर्शन घडवू शकतो आणि पात्रांच्या विविध कृतींचे नेमके अर्थ सांगण्याची त्यावर सार्वकालिक सत्याच्या स्वरुपाची भाष्ये करण्याची जबाबदारीदेखील निवेदकाने घेतली आहे. म्हणजेच हा कथाबाह्य सर्वसाक्षी निवेदक आहे. निवेदकाच्या या वैशिष्ट्यामुळे पात्रांपासून त्याने स्वतःचे वेगळे स्थान राखले आहे. आणि हे निश्चितपणे 'वरचे' स्थान आहे.

**पात्रचित्रण : (पात्रचित्रणविषयक दृष्टीकोण)**

वानरांच्या टोळ्यांमधील सदस्यांना पात्ररूप देताना कादंबरीचा निवेदक त्या वानरांचे एखादे शारीरिक वैशिष्ट्य अधोरेखित करणारे नाव ठेवतो उदाहरणार्थ डाव्या कानाचा मोठा तुकडा हाणामारीत गमावलेला मुड्या कानाचा मुडा वानर, वयोमानानुसार दात गमावलेली बोथरी वानरी, याचप्रमाणे लांडी, थोटी, काणी, लालबुड्या, जाडी, काळतोंडी, दाढीवाला अशी शारीरिक वैशिष्ट्ये किंवा विशिष्ट दृष्टिकोनातून पाहिल्यास ज्यांना व्यंग समजले जाईल अशी ही व्यंगदर्शक नावे आहेत. ज्या वानरामध्ये असे काही लक्षवेधी व्यंग नाही अशा वानरपात्राला त्याचे प्रथमदर्शनी जाणवेल असे शारीरिक वैशिष्ट्य अथवा एखादे वर्तनवैशिष्ट्य (खोड) दर्शवणारे नाव दिले जाते. उदाहरणार्थ तरणी, किंवा वयात आल्यानंतर नैसर्गिक ऊर्मीने नरांकडे आकृष्ट होणारी उनाडी, मारामारीत दुसऱ्या वानरीच्या बोकांडी बसणारी बोकांडी, संकटाची चाहूल आली की लपून बसणारी लाजरी अशाप्रकारे मानवी दृष्टिकोनातून हा निवेदक वानरांच्या नैसर्गिक प्रेरणासुलभ कृतींवर आधारित अशी वानरपात्रांची नावे ठेवतो. माणसे एकमेकांशी भांडताना दुसऱ्याला चिडवण्यासाठी अशाप्रकारची संबोधने वापरत असतात आणि त्यातून त्या विशिष्ट भांडणात आपला वरचष्मा प्रस्थापित करू पाहत असतात. सत्तान्तरच्या संहितेमध्येही निवेदक शक्य तेवढे विशेषाधिकार स्वतःकडे राखून संहितेच्या सत्ताकारणात हेच साधू पाहतो आहे.निवेदकाने केलेली विविध वर्णने, त्याने योजलेली उपमा-रूपके आणि भाष्ये ही वाचकाला कल्पना करायचे अथवा विचार करायचे श्रम न देता चित्र उभे करणारी तसेच तयार अर्थ उपलब्ध करून देणारी आहेत. हे पुस्तक प्रसिद्ध झाले त्याकाळात मराठीत निसर्गकथा, शिकारकथा जंगलभ्रमंतीवर अथवा काही कारणाने घडलेल्या एकाकी भटकंतीवर आधारित अनुभवकथने आणि त्यामधून लालू दुर्वे, मारुती चितमपल्ली, गो.नी. दांडेकर आणि स्वतः व्यंकटेश माडगूळकर यांचे याप्रकारचे माहितीपर लेखन या काळात लोकप्रिय होते. कथनात्म साहित्यकृतीमध्ये येणारी अशा प्रकारची सुरस आणि चमत्कारिक वर्णने वास्तवातून उद्भवणाऱ्या प्रश्नांना बगल देत वाचकांना गुंतवत गुंगवतात. मूर्त वास्तवापासून पलायनाचे कार्य अशा निवेदनामधून साधले जाते. तपशील म्हणजे ज्ञानाचा मुखवटा घातलेली माहिती पुरवणारा, खास मध्यम अभिरुचीला अपरिचित जगाचे दर्शन घडवण्याचा हा पवित्रा आहे

दर्यावर्दी सिंदबाद सौदागर या साहसी मुशाफिराने घरबश्या हिंदबाद या हमालाला आपल्या सफरींचे अनुभव कथन करत तेथील चित्तचक्षुचमत्कारिक गोष्टी सांगून थक्क करावे तशीच काहीशी प्रक्रिया या प्रकारच्या वाचनव्यवहारात अपेक्षित असते. स्वतः जंगलभ्रमंती न करता त्यासंबंधीच्या सुरस आणि चमत्कारिक कथा घरबसल्या कौतुकाने वाचणारा वाचकवर्ग हा अशा प्रकारच्या लेखनाचा गृहित वाचक म्हणता येईल. १९८२ चा काळ हा आपल्याकडे दूरदर्शनच्या आगमनासोबत क्रिकेटच्या 'बैठ्या' खेळाला लोकप्रियता मिळण्याची सुरुवात होण्याचा काळ होता याचीही एकूण अभिरुचीच्या संदर्भात सहजच आठवण होते. कथनप्रक्रियेवर

(पर्यायाने वाचकाच्या वाचनप्रक्रियेवर) निवेदक ठेवत असलेल्या या वर्चस्वातून काय साधते? लेखकनिवेदकाने वाचकाच्या वाचनप्रक्रियेवर, नियंत्रण राखण्यामधून कादंबरीच्या अर्थनिर्णयप्रक्रियेच्या खुलेपणावर मर्यादा आणून तिच्यातून प्रकट होणाऱ्या आशयाला एका बंदिस्त अर्थचौकटीत पक्केपणाने बसवणे हे अशा प्रकारच्या निवेदनाचे प्रयोजन असल्याचे वरील उदाहरणांवरून स्पष्ट होऊ शकेल.

**लेखकाची मूल्यदृष्टी : (निवेदनाची दिशा आणि प्रयोजन यासंबंधी)**

'...हाणामारी झाली, तर भटक्यांचं फार काही गमावणार नव्हतं, दुखापत होणार होती. क्वचित एखाद्या दुसऱ्या नराचा प्राण जाणार होता; पण मुडा हरला , तर त्याचं सर्वस्व जाणार होतं, सत्ता जाणार होती, प्रदेश जाणार होता, अन्न जाणार होतं, बायका जाणार होत्या आणि भणंग, कंगाल होऊन अपमानित जीवन त्याला पत्करावं लागणार होतं. हे सगळं मध्यम वयापासून पुढे ढळल्यावर होणार होतं आणि फार एकाकी, फार उपेक्षित असं मुडाच्या पदरी येणार होतं, म्हणून तो शहाण्या मुत्सद्याप्रमाणं प्रत्यक्ष संघर्ष टाळत होता.' भटक्या वानरांपैकी कोणाचा जीव जाणे यात भटक्यांचं फार काही गमावणार नव्हतं मुडाची सत्ता जाणे यात मुडाचं मात्र सर्वस्व जाणार होतं. याठिकाणी वरवर तटस्थ, वस्तुनिष्ठ वाटणाऱ्या निवेदकाचा पक्षपात कोणत्या बाजूने आहे हे उघड होत जाते. तीच गोष्ट सत्तापालटाच्या प्रक्रियेबद्दल निवेदक जे काही सांगतो त्यामध्ये तो या सत्ताधीशांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या किंवा येऊ घातलेल्या माद्यांचे मनोगत कोठेही व्यक्त होत नाही. माडगूळकरांच्या इतर कथासृष्टीमधील पात्राप्रमाणे येथेदेखील पुरुषपात्रांचेच वर्चस्व आहे. (कथेमध्ये नर सत्ताधारी आहेत इतक्याच अर्थाने नव्हे तर कथानकामध्ये त्यांना मिळालेले महत्त्व आणि उपलब्ध झालेला अवकाश यादृष्टीने)

वरील काहीश्या दीर्घ अवतरणामध्ये निवेदक मुडाच्या दृष्टीक्षेत्रनियंत्रणाचा स्वीकार करतो. मात्र ते सर्व सादर करण्यामागे असलेला निवेदकाने पुरस्कारलेला दृष्टिकोन मात्र वन्य प्राण्यांचा नसून तो एखाद्या मध्यमवयीन, मध्यमवर्गीय, मध्यममार्गी माणसाचा असावा अशाच रीतीने येतो. येथे मुडा या पात्राला पडलेले प्रश्न हे अस्तित्वाचे प्रश्न नसून जीवनमानाच्या पातळीसंबंधीचे प्रश्न आहेत. या ठिकाणी पात्राच्या मनात प्रवेश करून त्याचे मनोगत प्रकट करताना निवेदकाचा दृष्टिकोण आणि त्याचा गृहित वाचक स्पष्टपणे जाणवतो. कादंबरीत निवदक हा लेखकीय भूमिकेचे प्रतिनिधीत्व करणारा एक महत्त्वाचा घटक असतो. त्यामुळे निवेदक आणि पात्रे याच्यातील वर्चस्वसंबंध, निवेदकाचे कथनवस्तुवरील प्रभुत्व, कादंबरीत चित्रित जगाकडे पाहाण्याचा त्याचा दृष्टिकोण यांविषयी वर केलेल्या विश्लेषणामधून लेखकाच्या मूल्यदृष्टीविषयी काही ठळक निरिक्षणे खालीलप्रमाणे मांडता येतील. एक म्हणजे लेखकाने कादंबरीत चित्रित जगापासून अंतर राखत स्वतःचे विशिष्ट असे वरचे स्थान अबाधित ठेवून एकूणच कादंबरीतील संभाषितावर आपले वर्चस्व राखले आहे. तसेच दुसरा निष्कर्ष म्हणजे निवेदकाच्या या वर्चस्वाच्या माध्यमातून लेखकाने कादंबरीतील आशयाच्या खुलेपणाला मर्यादा घालत आपल्या गृहीत वाचकाला अनुकूल असणाऱ्या मध्यमवर्गीय चौकटीत वन्य प्राण्यांचे मुक्त जीवन बसवण्याचा प्रयत्न केला आहे. पशूंमधील सत्तासंघर्षाचे स्वरूप अत्यंत ढोबळ आहे. हे सत्तान्तर ज्या नागरिकाच्या अथवा प्रजाजनांच्या संदर्भात घडते त्यांना या प्रक्रियेविषयी मनातल्या मनातही बोलायला कोणताही वाव ठेवलेला नाही. त्यामुळे एकआवाजी होत गेलेली सत्तान्तर ही कादंबरिका माणसांमधील सत्तासंघर्षाचे, त्यामधील व्यामिश्रतेचे स्वरूप स्पष्ट करण्याबाबत अपुरी ठरते. ज्या काळात ही कादंबरिका प्रसिद्ध झाली तेव्हा देशव्यापी राजकीय आणिबाणी आणि सत्तान्तर नुकतेच घडून गेले होते त्या पार्श्वभूमीवर या पुस्तकाची भूमिका ही त्याचा आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही अंगानी राजकीयदृष्ट्या एकचालकानुवर्तीत्वाचे समर्थन करणारीच आहे असा निष्कर्ष मांडता येईल.

**संदर्भ**

१. *माडगूळकर, व्यंकटेश, सत्तान्तर, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४, पहिली आवृत्ती, जुलै १९८२.*
२. *थोरात, हरिश्चंद्र, कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली ११ जुलै २०११.*
३. *थोरात, हरिश्चंद्र, कादंबरी : एक साहित्यप्रकार, शब्द पब्लिकेशन, मुंबई, आवृत्ती पहिली ऑगस्ट २०१०.*
४. *औटी , शैलेश, मिखाईल बाख्तीनचा संभाषित विचार : वासूनाकाच्या संदर्भात, मुंबई विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर करण्यात आलेली प्रबंधिका, मार्गदर्शक डॉ. वसंत पाटणकर, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई, २००३.*
५. *Herman, David, Jahn Manfred, Ryan Marie-Laure (Ed..), Routledge Encyclopedia of Narrative Theory, Routledge, New York NY 10016, First published 2005 First Indian Reprint 2008.*
६. *Bakhtin Mikhail, problems of Dostoevsky poetics. Ed. And Tr. By Caryl Emerson, Theory and History of Literature, Vol. 8, Manchester University press, Manchester, 1984*